# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

## शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा - संगणक लघुलेखन डिसेंबर - २०२४

**(प्रथम सत्र - एप्रिल- २०२४ ते सप्टेंबर -२०२४)**

## GCC-Computer Shorthand DECEMBER- 2024

**(FIRST SEMI. – APRIL - 2024 TO SEPTEMBER – 2024 )**

# *अधिसूचना*
# *व*
# *ऑनलाईन आवेदनपत्र स्वीकृती*


**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**

**व्दारा महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ कार्यालय इमारत**

(दुसरा व चौथा मजला) सर्व्हे नं.८३२ ए भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे- ४११ ००४

**दूरध्वनी क्रमांक : ०२०-२९७०९३९६/२९७०९६९७**

**E-mail - mscegcctbc@gmail.com**

**Website : www.mscepune.in**

## शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा - संगणक लघुलेखन
## (GCC - Computer Shorthand) परीक्षा डिसेंबर - २०२४

**(प्रथम सत्र - एप्रिल- २०२४ ते सप्टेंबर -२०२४)**

## परीक्षेची संबंधित परिषदेतील अधिकारी

| अ. क्र. | नांव | पद | मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|
| १. | श्री. नंदकुमार बेडसे | अध्यक्ष | ०२०-२९७०९३९६ |
| २. | श्रीम. अनुराधा ओक | आयुक्त | ९८२२९७९७३० |
| ३. | श्री. संजय राठोड | उपायुक्त | ९६५७३७८१३७ |
| ४. | श्रीम. मंगल वाव्हळ | सहाय्यक आयुक्त | ९८५०७३२९८४ |
| ५. | श्रीम. अर्चना सरदार | अधीक्षक | ९७६६५३४४२० |
| ६. | श्रीम. संगीता चव्हाण | लेखाधिकारी | ०२०-२९७०९३९६ |
| **ऑनलाईन माहिती भरताना काही तांत्रिक अडचणी आल्यास त्या करीता ०२० - २९७०९३९६/२९७०९६९७ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क करावा.** | | | |

## महत्त्वाचे

**१) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याच्या प्रक्रियेत महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.**

**२) अधिसूचनेचे व संकेतस्थळावरील सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करावे.**

**३) कृतीओघ तक्त्याचे (FlowChart) अवलोकन करुनच आवेदनपत्रे भरावीत.**

**४) संस्था नुतनीकरण प्रत ऑनलाईन पद्धतीने भरल्याशिवाय विद्यार्थ्यांचे ऑनलाईन आवेदनपत्रे भरता येणार नाहीत.**

**५) आवेदनपत्र भरताना फोटो, नाव, सही बाबत कोणत्याही प्रकारच्या चुका होणार नाहीत याची दक्षता विद्यार्थ्यांनी व संस्थाचालक यांनी घ्यावी.**

**६) आवेदनपत्रे भरल्यानंतर ऑनलाईन एकत्रित शुल्क भरणे आवश्यक आहे. यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाणार नाही. ऑनलाईन बँकीग, क्रेडीट/ डेबीट कार्डाद्वारे विहित मुदतीत शुल्क भरण्याची दक्षता घ्यावी.**

**(चलन प्रिंट काढून बँकेत जाऊन रक्कम भरण्याचा पर्याय उपलब्ध नाही.)**

**<u>परीक्षा प्राधान्य</u>**

जा.क्र.मरापप/जीसीसी/प्रशा/संगलघु/अधिसूचना/डिसें२०२४/४३०७
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,
भांबुर्डा, शिवाजीनगर, पुणे-०४
दिनांक :- ०१/१०/२०२४.

**प्रति,**

**संस्थाचालक,**
**सर्व शासनमान्य संगणक टायपिंग संस्था,**
**महाराष्ट्र व गोवा राज्य.**

**विषय :- शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC- Computer Shorthand) डिसेंबर - २०२४ अधिसूचना व आवेदनपत्र स्वीकृती कार्यक्रम.**

**संदर्भ :- टंकलेखन, लघुलेखन आणि संगणक टायपिंग अभ्यासक्रम मान्यता व संचालन नियम १९९१ सुधारित नियमावली २०२३ दि. २७/०४/२०२३.**

राज्यातील शासन मान्यता प्राप्त संगणक टायपिंग संस्थांमधील नियमित विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेमार्फत शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा (GCC - Computer Shorthand मराठी/ हिंदी /इंग्रजी लघुलेखन - सर्व विषय) डिसेंबर- २०२४ ' ऑनलाईन ' पद्धतीने घेण्यात येणार आहे. सदर परीक्षेस प्रविष्ट होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांकडून त्यांच्या संगणक टायपिंग संस्थेमार्फत आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात येत आहेत.

प्रथम सत्र - एप्रिल - २०२४ ते सप्टेंबर - २०२४ या सत्रासाठी किंवा यापूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनकडून त्यांच्या संगणक टायपिंग संस्थेमार्फत विषय व गतीनिहाय स्वतंत्र आवेदनपत्र भरता येतील.

तसेच पुनर्परीक्षार्थी (रिपीटर) इंग्रजी/मराठी/हिंदी लघुलेखन विषयांसाठी परीक्षेस प्रविष्ठ होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**अ) परीक्षेस पात्र होण्यासाठीचे निकष :**

१. उमेदवार शासनमान्य शाळेतून **किमान १० वी उत्तीर्ण** असावा.
२. शासनमान्य संगणक टायपिंग संस्थेत **नियमित विद्यार्थी** म्हणून प्रशिक्षण पूर्ण केलेले असावे.

**आ) परीक्षेचे वेळापत्रक :**

**सदर सत्रातील संगणक लघुलेखन विषयाच्या परीक्षा १५ ते ३० डिसेंबर २०२४ या कालावधी दरम्यान घेण्यात येतील या परीक्षांच्या तारखा यथावकाश परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल, याची संस्थचालकांनी नोंद घ्यावी.**

**इ) शुल्क :-**

***परीक्षा शुल्क** :-रु. १,०००/- प्रतिविषय/प्रतिविद्यार्थी (नियमित)
रु. १,०००+ १००/- प्रतिविषय/प्रतिविद्यार्थी (विलंब)
रु. १,०००+१००+अतिविलंब शुल्क रु. ५०/- (प्रति परीक्षार्थी, प्रति विषय, प्रति दिन)

**शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा - संगणक लघुलेखन (GCC- Computer Shorthand) परीक्षांमधील आवेदनपत्रातील त्रुटी जसे परीक्षार्थ्याचे स्वत:चे नाव, आडनाव, वडीलांचे/पतीचे नाव, आईचे नाव, विषय बदल, फोटो बदल, बॅच बदल, केंद्र बदल इ. कोणत्याही प्रकारची दुरुस्ती करुन दिली जाणार नाही, याची संबंधित संस्थाचालकांनी व विद्यार्थ्यांनी याची नोंद घ्यावी.**

**तसेच विद्यार्थ्याच्या नावात, आडनावात, वडीलांच्या/पतीच्या नावात किंवा आईच्या नावात फक्त अपवादात्मक परिस्थितीत स्पेलिंग दुरुस्ती असेल ज्यामुळेविद्यार्थ्याचे नाव/ आडनाव/ वडीलांचे नावात पूर्ण बदल होत नसेल तरच दुरुस्ती करुन देण्यात येईल. त्यामुळे आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्यांनी अत्यंत काळजीपुर्वक भरावे व आपली माहिती Submit करावी.**

उपरोक्त विषयानुसार शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र परीक्षा - संगणक लघुलेखन **(GCC- Computer Shorthand)** डिसेंबर -२०२४ (प्रथम सत्र एप्रिल- २०२४ ते सप्टेंबर -२०२४) परीक्षांसाठी विद्यार्थ्यांची परीक्षा शुल्कासह आवेदनपत्र भरणेसाठी **दि. ०१/१०/२०२४ ते दि. २५/१०/२०२४** या कालावधीत लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार नियमित, विलंब व अतिविलंब शुल्क आकारुन आवेदनपत्र भरता येईल.**

| अ.क्र. | तपशील | कालावधी | शुल्क आकारणी |
|---|---|---|---|
| १. | परीक्षेच्या अधिसूचनेपासून | २५ दिवस | नियमित शुल्क रु १,०००/- (प्रति विषय, प्रति विद्यार्थी) |
| २. | नियमित शुल्काच्या मुदतीनंतर विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. | ३ दिवस | नियमित शुल्क रु. १,०००/- + विलंब शुल्क रु १००/- (प्रति विषय, प्रति विद्यार्थी) |
| ३. | विलंब शुल्काच्या मुदतीनंतर अतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे. | २ दिवस | नियमित शुल्क १,०००/- + विलंब शुल्क १००/- + अतिविलंब शुल्क रु.५०/- (प्रति परीक्षार्थी, प्रति विषय, प्रति दिन) |

**वरील कालावधीत परीक्षार्थ्यांची आवेदनपत्र भरलेनंतर विद्यार्थ्याच्या नावात, आडनावात, वडिलांच्या/ पतीच्या नावात किंवा आईच्या नावात फक्त स्पेलिंग दुरुस्ती करणेसाठी खालील तक्त्याप्रमाणे ऑनलाईन सशुल्क दुरुस्ती करता येईल.**

| अ.क्र. | तपशील | कालावधी | शुल्क आकारणी |
|---|---|---|---|
| **१.** | **परीक्षेच्या अधिसूचनेपासून ३० दिवसांपर्यंत दुरुस्ती लिंक सुरु राहील.** | **३० दिवस** | **विनाशुल्क** |
| **२.** | **प्रवेशपत्र निर्गमित झाल्यापासून परीक्षेपूर्वी ऑनलाईन दुरुस्ती बाबत.** | **परीक्षेपूर्वी ३ दिवस अगोदर** | **रु. २००/-** |

**प्रवेशपत्र निर्गमित झाल्यापासून परीक्षेपूर्वीची फक्त स्पेलिंग दुरुस्ती (विद्यार्थ्याचे नावात, आडनावात वडिलांच्या/पतीच्या किंवा आईच्या नावात) असल्यास रु. २००/- दंड आकारुन ऑनलाईन पध्दतीने देण्यात येईल.**

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेचे दि. १९/१०/२०१९ चे परिपत्रकान्वये परीक्षेनंतर संस्थाचालकांनी परीक्षार्थ्याचे नाव, वडिलांचे / पतीचे नाव, आडनाव,आईचे नावाचे स्पेलिंग दुरुस्त्या ह्या प्रस्तावास लागणारी कागदपत्रे पूर्ण केल्यानंतरच दुरुस्त्या करुन देण्यात येतील. सदर प्रस्तावानुसार स्पेलिंग दुरुस्तीमुळे पूर्ण नावात, परीक्षार्थ्याच्या नावात, वडिलांच्या / पतीच्या नावात, आडनावात, आईच्या नावात पूर्ण बदल होत असल्यास अशा दुरुस्त्या करुन दिल्या जाणार नाहीत.**

**इ) शुल्क भरण्याची पध्दत:-**

१. संस्थेने सर्व विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परिषदेच्या संकेतस्थळावर देण्यात आलेल्या **लिंकवर संस्था लॉगीनद्वारे ऑनलाईन पद्धतीने भरावे**.

२. ऑनलाईन पद्धतीने शुल्क भरुन चलन अपडेट झाल्याशिवाय आवेदनपत्र भरण्याची प्रक्रिया पूर्ण होणार नाही याची नोंद घेण्यात यावी.**(चलनाद्वारे किंवा ऑफलाईन पद्धतीने शुल्क स्वीकारले जाणार नाही तसेच इतर कोणत्याही पद्धतीने परीक्षा शुल्क भरण्यात येऊ नये, ते ग्राह्य धरण्यात येणार नाही व शुल्क परत करण्यात येणार नाही.)**

३. नियमित शुल्क कोणत्याही कारणामुळे विहित कालावधीत न भरल्यास विलंब व अतिविलंब शुल्क लागू होईल.

**उ) परीक्षेची ऑनलाईन आवेदनपत्रे स्विकृतीचा कार्यक्रम :-**

| अ.क्र. | कालावधी | शुल्क प्रकार | शुल्क (रक्कम) रुपये |
|---|---|---|---|
| १. | दि. ०१/१०/ २०२४ ते दि. २५/१०/२०२४ | परिक्षार्थ्यांचे नियमित शुल्कासह आवेदनपत्र भरणे | १,०००/- (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी) |
| २. | दि. २६/१०/२०२४ ते दि. २८/१०/२०२४ | परिक्षार्थ्यांचे विलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे | (१,०००/- + १००/-) (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी) |
| ३. | दि. २९ /१०/२०२४ ते दि. ३०/१०/२०२४ | परिक्षार्थ्यांचेअतिविलंब शुल्कासह आवेदनपत्र भरणे | (१,०००/- + १००/-)+ ५०/- (प्रतिविषय, प्रति परिक्षार्थी, प्रति दिन) |

**टिप :-***संस्थाचालकांनी उपरोक्त वेळापत्रकाप्रमाणे कार्यवाही करावी. ऑनलाईन प्रक्रियेमुळे उपरोक्त कोणत्याही टप्प्यावर विलंब होता कामा नये

*ऑनलाईन आवेदनपत्राची एक प्रिंट काढून विद्यार्थ्यांची स्वाक्षरी, संस्थाचालकाच्या स्वाक्षरी व शिक्क्यासह संबंधित संस्थेने आपल्या दप्तरी जतन करुन ठेवावी.

**ई) बँकेचे चलन वाटप :-**

परीक्षा शुल्क केवळ ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगिनद्वारे भरावयाचे असल्याने ऑफलाईन चलन देण्यात येणार नाही. **(चलनाने शुल्क भरल्यास ते ग्राह्य धरले जाणार नाही..)**

**उ) आवेदनपत्रची उपलब्धता:-**

आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावयाची आहेत. सदरची आवेदनपत्रे परिषदेच्या संकेतस्थळावर **दि. ०१/१०/२०२४** पासून उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

# ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

## नियमित (REGULAR)

www.mscepune.in संकेतस्थळाला भेट देणे.

⇩

GCC- COMPUTER SHORTHAND EXAMINATION या Tab वर क्लिक करा.

⇩

ID व Password द्वारे Login करा.

⇩

GCC-Computer Shorthand Tab वर क्लिक करणे

⇩

नुतनीकरण आदेश UPLOAD करणे.

⇩

GCC-Computer Shorthand Application form वर क्लिक करणे

⇩

सर्व परीक्षार्थ्यांची माहिती अचूक भरल्याची पुन्हा खात्री करुनच Submit बटनावर क्लिक करा.

⇩

भरलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून त्यावर परिक्षार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन दप्तरी जपून ठेवावी.

⇩

GCC-Computer Shorthand Tab वर क्लिक करुन विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगीनद्वारे परीक्षा शुल्क भरावे.

⇩

सर्व परीक्षार्थ्यांची आवेदनपत्रे भरुन झाल्यानंतरच Exam Candidates list ची प्रिंट घ्यावी

## ऑनलाईनआवेदनपत्र भरण्याचा कृतीओघ तक्ता (Flow Chart)

### पुनर्परिक्षार्थी (REPEATAR)

www.mscepune.in संकेतस्थळाला भेट देणे.

⇩

GCC- COMPUTER SHORTHAND EXAMINATION या Tab वर क्लिक करा.

⇩

ID व Password द्वारे Login करा.

⇩

GCC-Computer Shorthand Tab वर क्लिक करणे

⇩

नुतनीकरण आदेश UPLOAD करणे.

⇩

GCC-Computer Shorthand Application Form Repeater वर क्लिक करावे.

⇩

Candidates List समोरील Apply बटनावर क्लिक करून त्यामधील मुद्देनिहाय अचूक माहिती भरा.

⇩

Apply केलेल्या सर्व परीक्षार्थ्यांच्या यादीचे अवलोकन करणे.

⇩

भरलेल्या आवदेनपत्राची प्रिंट काढून त्यावर परीक्षार्थी संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन दप्तरी जपून ठेवावी.

⇩

GCC-Computer Shorthand Application Online Payment Tab वर क्लिक करुन विहित मुदतीत ऑनलाईन पद्धतीने संस्था लॉगीनद्वारे परीक्षा शुल्क भरावे.

⇩

सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे भरून झाल्यानंतरच Exam Candidates list ची प्रिंट घ्यावी

**ऐ) ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याबाबत सूचना :-**

**सर्वसाधारण सूचना:-**

१. ऑनलाईन आवेदनपत्र भरण्याकरीता प्रथमत: परिषदेच्या www.mscepune.in या संकेतस्थळास भेट द्यावी.
२. सदर संकेत स्थळावरील G.C.C.- Computer Shorthand Examination वर Click करावे. त्यानंतर स्क्रीनवर Login चा बॉक्स दिसेल त्यामध्ये दिलेली माहिती संस्था कोड व पासवर्ड द्वारे भरावी व Login करावे.
३. ऑनलाईन आवेदनपत्र भरताना चुका होऊ नयेत म्हणून संस्थाचालकांनी परीक्षार्थ्यांचा उपस्थितीत+ आवेदनपत्र अचूक भरावे.
४. **आवेदनपत्र भरलेल्या परीक्षार्थ्यांची यादी दिसेल.**
५. आवेदनपत्र भरताना अंध परीक्षार्थ्यांबाबत सनेत्रवाचक (मदतनीस) हवा असल्यास सनेत्र वाचकाची माहिती अचूक भरावी.सनेत्रवाचक एकदा निश्चित केल्यानंतर सनेत्रवाचकाच्या नावात बदल करता येणार नाही.
६. परीक्षा परिषदेकडून घेण्यात येणाऱ्या जीसीसी- संगणक लघुलेखन परीक्षांचे आवेदनपत्र भरल्यानंतर परिषदेकडून त्यानुसारच प्रवेशपत्र निर्गमित केली जातात.
७. **परीक्षेनंतर नावांमधील स्पेलिंग दुरुस्त्या तसेच पूर्ण नाव दुरुस्तीचे, विषय दुरुस्तीचे प्रस्ताव या कार्यालयाकडे सादर होतात. याचाच अर्थ संस्थाचालकांकडून आवेदनपत्र भरताना पूर्णपणे दक्षता घेतली जात नाही असे निदर्शनास येत आहे. तरी सदर बाबत दक्षता घ्यावी.**
८. वरील प्रकारच्या चुका होऊ नयेत यासाठी संस्थाचालकांनी आवेदनपत्र भरताना विद्यार्थ्यांची आवश्यक ती माहिती विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रावरुन (शाळा सोडल्याचा दाखला / शाळेचे बोनाफाईड प्रमाणपत्र १०वी /१२वी गुणपत्रक / प्रमाणपत्र) पडताळणी करुन आवेदनपत्र भरावेत.

**ओ) संस्थाप्रमुख व परीक्षार्थी यांच्यासाठी महत्त्वाच्या बाबी :-**

१. सदर परीक्षा ही ऑनलाईन लघुलेखन मराठी /हिंदी/ इंग्रजी सर्व विषयांसाठीची आहे.
२. संस्थेने आपल्या संस्थेतील परीक्षार्थ्यांचे नोंदणी (Regitration) आवेदनपत्र (Application Form) पूर्ण भरल्यानंतर आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी. नाव, विषय, गती, सही, फोटो बरोबर असल्याची खात्री करुन विद्यार्थ्यांची स्वाक्षरी घ्यावी. " **सदर आवेदनपत्राची प्रत संस्थेत जतन करुन ठेवावी. "**

   प्रवेशपत्र निर्गमित झाल्यानंतर वा परीक्षेनंतर कोणताही बदल केला जाणार नाही. संगणकीय / मुद्रण दोषामुळे चूक झाल्यास जतन केलेल्या आवेदनपत्राची प्रत सादर केल्यानंतरच प्रमाणपत्रावर दुरुस्ती केली जाईल.
३. गुणपडताळणीसाठी परिषदेकडे अर्ज केलेल्या अनुत्तीर्ण परीक्षार्थ्याच्या गुणपडताळणीचा निकाल अप्राप्त असेल तर गुणपडताळणीच्या निकालाची वाट न पाहता विहित मुदतीत पुनर्परीक्षार्थी म्हणून ऑनलाईन आवेदनपत्र भरावे लागेल. त्यासाठी स्वतंत्र कालावधी दिला जाणार नाही.
४. कोणत्याही कारणामुळे या पुर्वीच्या परीक्षेचा निकाल राखीव असल्यास राखीव निकालाची प्रतिक्षा न करता विहित मुदतीतच अशा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र पुनर्परीक्षार्थी म्हणून भरता येईल. राखीव निकाल उशीरा प्राप्त झाला, या सबबीखाली स्वतंत्र कालावधी मिळणार नाही.
५. मागील परीक्षांमधील (GCC/ GCC-TBC/ GCC - Computer Shorthhand) गैरप्रकार प्रकरणी चालू (येणाऱ्या) परीक्षेस प्रतिबंध (डिबार) केलेल्या परीक्षार्थ्यांचे आवेदनपत्र भरु नये. त्याबाबतची खात्री संस्थाचालकांनी करावी. अशा विद्यार्थ्यांचे आवेदनपत्र संस्थाचालकांनी **भरल्यास सदर संस्थेची हि कृती गंभीर व नियमबाहय समजणे येईल.**

६. **विद्यार्थी उच्चीकरणासाठी प्रविष्ठ होत असेल तर प्रवेशपत्रावर तसे स्पष्टपणे नमूद करण्यात येईल. तसेच उच्चीकरणा वेळी सदर परीक्षेचा निकाल अनुत्तीर्ण आल्यास पूर्वीच्या विषयांचा निकाल देखिल अनुत्तीर्ण घोषित करण्यात येईल.**

७. **परीक्षार्थी संगणक टायपिंगच्या अनेक विषयांसाठी परीक्षेस प्रविष्ठ होणार असल्यास संबंधित परीक्षार्थ्यांचे एकच आवेदनपत्र भरण्यासाठी ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन देण्यात येत आहे.**

८. **सदर परीक्षेसाठी आवेदनपत्र भरताना Live webcam ने विद्यार्थ्याचा Photo capture करुन अपलोड करावा.**

९. **आवेदनपत्रावर सही सोबतचा फोटो हा पासपोर्ट आकाराचा रंगीत आणि नुकताच काढलेला असावा. जुना, शालेय, बालपणीचा चालणार नाही. पासपोर्ट आकाराचा फोटो आणि वेब कॅमेराने काढलेल्या फोटोमध्ये तफावत आढळता कामा नये.**

१०. **फोटो काढलेल्या ठिकाणी म्हणजेच लोकेशन तपासण्याच्या दृष्टीने वेब कॅमेराने काढलेला फोटो मान्यता मिळालेल्या स्वत:च्या संस्थेच्या कार्यालयात काढलेलाच असावा. इतरत्र काढलेला चालणार नाही. वेब फोटो अतिशय स्वच्छ प्रकाशात काढलेला, स्पष्ट दिसेल असाच असावा.**

११. **परिषदेकडून देण्यात आलेल्या बॅचमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. परीक्षार्थ्यांना शक्यतो संगणक टायपिंग संस्थेच्या जवळचे परीक्षा केंद्र परिषदेकडून दिले जाईल. मात्र कमी विद्यार्थी संख्या, आवश्यक साधनसामग्रीची उपलब्धता न होणे या बाबींमुळे अन्य /दूरचे परीक्षा केंद्र दिले जाऊ शकते. परीक्षा परिषदेच्या स्तरावरुन देण्यात आलेल्या परीक्षा केंद्रामध्ये कोणत्याही परिस्थितीत बदल केले जाणार नाही.**

१२. **परीक्षार्थ्याचे आवेदनपत्र भरताना संस्थाचालकांनी परीक्षार्थ्यांचा ई-मेल आयडी व व्हाटस्ॲप नंबर नमूद करावा. संस्थाचालकांनी स्वत:ची माहिती भरु नये.**

१३. परीक्षेपूर्वी अंदाजे ५ दिवस अगोदर पात्र परीक्षार्थ्यांची प्रवेशपत्रे (हॉल तिकीट) संस्थांना परिषदेच्या संकेतस्थळावर संस्थांच्यालॉगिनमध्ये ऑनलाईन दिली जातील. त्यानुसार संस्थांनी आपल्या संस्थेतील सर्व परिक्षार्थ्यांच्या प्रवेशपत्रावर विद्यार्थ्याचा अद्यावत पासपोर्ट आकाराचा रंगीत फोटो चिकटवून फोटोवर संस्थाचालकांनी संस्थेचा अर्धा शिक्का व स्वाक्षरीसह विद्यार्थ्यांना प्रवेशपत्र वितरीत करणे बंधनकारक राहील.

१४. **परीक्षार्थीनी भरलेले परीक्षा शुल्क कोणत्याही सबबीवर परत मिळणार नाही याची उमेदवारांनी व संस्थाचालकांनी नोंद घ्यावी. त्यामुळे अतिरिक्त शुल्क भरण्यात येवू नये.**

१५. परीक्षा शुल्काच्या ऑनलाईन पावतीवर दिनांक, संस्थेचे नाव व सांकेतांक असल्याची खात्री करावी.

१६. **दिव्यांग (अंध) विद्यार्थ्यांबाबत :**-अंध विद्यार्थ्यांना इंग्रजी टंकलेखन ३० श.प्र.मि. परीक्षेस मदतनीस (सनेत्र वाचक) घेऊन बसण्यासाठी शासनाने शासन निर्णय शालेय शिक्षण विभाग क्र. बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि. १०/१०/२००१ नुसार मान्यता दिलेली आहे. तसेच अंध विद्यार्थ्यांना सनेत्र (मदतनीस) वाक्य, शब्द वाचल्यानंतर ते टंकलिखित करण्यास उशीर लागण्याची शक्यता लक्षात घेऊन टंकलेखन परीक्षेच्या विभाग दोन साठी (गती उतारा) ७ मिनिटांऐवजी १० मिनीटे म्हणजेच ३ मिनिटे अतिरिक्त वेळ दण्यास शासनाने शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. बीजीई २००१/९३९७५/(१९०/२००१)/साशि-१, दि.३१ डिसेंबर २००१ नुसार मान्यता दिलेली आहे. ही सवलत GCC-TBC परीक्षेसाठीही लागू राहील.

१७. **दिव्यांग विद्यार्थ्यांबाबत :**- ४० % टक्के किंवा त्याहून अधिक कायमस्वरुपी सर्व दिव्यांग परीक्षार्थी व जिल्हा शल्य चिकित्सकांनी (जिल्हा सिव्हिल सर्जन) तसे प्रमाणीत केलेले असल्यास ३० श.प्र.मि. गतीची परीक्षा, या टंकलेखन ाच्या परीक्षेतील गती उताऱ्यासाठी सर्व दिव्यांग उमेदवारांस ७ मिनिटांऐवजी १० मिनीटे म्हणजेच ३ अधिक मिनीटांची सवलत देण्यास शासनाने, शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. परीक्षा -२०१५/प्र.क्र.२७२/एस.डी.२,दि. २० ऑक्टोबर २०१६ नुसार मान्यता दिलेली आहे. ही सवलत G.C.C.- Computer Shorthand Examination परीक्षेसाठीही लागू राहील.

१८. आवेदनपत्रात खोटी माहिती देणे, आवेदनपत्रासोबतच्या दस्तऐवजात खाडाखोड करुन सादर करणे या कारणांमुळे उमेदवार परीक्षेसाठी कोणत्याही टप्प्यावर अपात्र ठरेल व त्याची / तिची सदर परीक्षेची संपादणूक रद्द होईल. तसेच संबंधित संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.

१९. परीक्षार्थी, संस्थाचालक यांनी आवेदनपत्रावरील Submit या बटनावर क्लिक करण्यापूर्वी आवेदनपत्रामधील आवश्यक असलेले सर्व रकाने बरोबर भरले असल्याची खात्री करावी.

२०. संस्थाचालकांनी संस्था नुतनीकरण न करता विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ करु नयेत. विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ठ केल्याचे निदर्शनास आल्यास आपल्या संस्थेचा सांकेतांक रद्द करण्यात येईल.

२१. परीक्षार्थीचे एक विषयासाठी एकच आवेदनपत्र भरावे. एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे भरल्यास त्या विषयाची सर्व आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील, त्यामुळे याबाबत गांभीर्याने नोंद घ्यावी. परीक्षार्थींनी एकाच विषयाची एकापेक्षा जास्त आवेदनपत्रे त्याच किंवा इतर संस्थेमधून भरली नसल्याची संस्थाप्रमुखांनी खात्री करावी. तसे हमीपत्र परीक्षार्थ्यांकडून घेऊन आपल्या दप्तरी ठेवावे.

२२. संस्थाप्रमुखांने कोणत्याही अनधिकृत संगणक टंकलेखन संस्थेच्या परीक्षार्थ्यांचे आवेनदनपत्र आपल्या संस्थेमार्फत भरु नयेत. तसे निदर्शनास आल्यास सदर भरलेली सर्व ऑनलाईन आवेदनपत्रे रद्द करण्यात येतील व आपल्या संस्थेची शासन मान्यता काढून घेण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घेण्यात यावी.

२३ .विद्यार्थी /संस्थाचालक यांनी आवेदनपत्रात नमूद केलेली माहिती चुकीची आढळल्यास सदर विद्यार्थ्याचा निकाल कोणत्याही टप्प्यावर रद्द केला जाईल.

२४. विद्यार्थ्यांचे बॅच बदल, विषय बदल याबाबतचे ई-मेलव्दारे अथवा प्रत्यक्ष/ समक्ष प्राप्त होणरे प्रस्ताव/अर्ज यांची दखल घेतली जाणार नाही. याची नोंद सर्व संबंधितांनी घ्यावी.

२५. संपूर्ण माहिती पुन्हा वाचून खात्री केल्यांनतर submit या बटनावर Click करावे. Submit केलेल्या आवेदनपत्राची प्रिंट काढून ठेवावी. त्यावर विद्यार्थी व संस्थाचालकांनी स्वाक्षरी करुन नाव व संस्थाकोड लिहावा व आपल्या दप्तरी जपून ठेवावी

२६.आपल्या संस्थेतील सर्व परीक्षार्थ्यांची ऑनलाईन आवदेनपत्र भरुन झाल्यानंतर स्क्रिनवरील Pay Online वर Click करुन ऑनलाईन पध्दतीने परीक्षा शुल्क विहित मुदतीत भरावे. ऑनलाईन पावतीची प्रिंट घ्यावी.

***स्वाक्षरीत/-***

**आयुक्त,**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे-४११ ००४**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव:-**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक सर्व, महाराष्ट्र राज्य.
२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद सर्व, महाराष्ट्र राज्य.
३. शिक्षण निरीक्षक, बृहमुंबई (उत्तर/दक्षिण/पश्चिम)

**प्रत माहितीस्तव सविनय सादर:-**

१. मा. सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
२. मा.आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे-०१

**सुधारित** विवरणपत्र – क

## इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन

| विषय | विषय व गती | विषय कोड | सुधारित पूर्वअट |
|---|---|---|---|
| इंग्रजी | लघुलेखन ६० श.प्र.मि. | ५० | इंग्रजी टंकलेखन किमान ३० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. |
| | लघुलेखन ८० श.प्र.मि. | ५१ | इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १०० श.प्र.मि. | ५२ | इंग्रजी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १२० श.प्र.मि. | ५३ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १३० श.प्र.मि. | ५४ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १४० श.प्र.मि. | ५५ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १५० श.प्र.मि. | ५६ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १६० श.प्र.मि. | ५७ | इंग्रजी टंकलेखन ५० श.प्र.मि.किंवा इंग्रजी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व इंग्रजी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| मराठी | लघुलेखन ६० श.प्र.मि. | ६० | मराठी टंकलेखन किमान ३० श.प्र.मि.किंवा मराठी संगणक टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. |
| | लघुलेखन ८० श.प्र.मि. | ६१ | मराठी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा मराठी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १०० श.प्र.मि. | ६२ | मराठी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा मराठी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १२० श.प्र.मि. | ६३ | मराठी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा मराठी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि. व मराठी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| हिंदी | लघुलेखन ६० श.प्र.मि. | ७० | हिंदी टंकलेखन किमान ३० श.प्र.मि.किंवा हिंदी संगणक टंकलेखन किमान ३० श.प्र.मि. |
| | लघुलेखन ८० श.प्र.मि. | ७१ | हिंदी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा हिंदी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि.व हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १०० श.प्र.मि. | ७२ | हिंदी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा हिंदी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि.व हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मि. |
| | लघुलेखन १२० श.प्र.मि. | ७३ | हिंदी टंकलेखन ४० श.प्र.मि.किंवा हिंदी संगणक टंकलेखन ४० श.प्र.मि.व हिंदी लघुलेखन ६० श.प्र.मि. |

१) उमेदवार एकाच वेळी इंग्रजी / मराठी / हिंदी टंकलेखन ३० व ४० श.प्र.मि. टंकलेखन परीक्षेसाठी बसू शकेल.

२) उमेदवार एकाच वेळी इंग्रजी / मराठी / हिंदी लघुलेखन ८० व १०० श.प्र.मि. किंवा १०० व १२० श.प्र.मि. परीक्षेसाठी बसू शकेल.

३) उमेदवाराने शासनमान्य औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून इंग्रजी / मराठी / हिंदी टंकलेखन अथवा लघुलेखन परीक्षा उत्तीर्ण असल्यास त्यास उच्चस्तर श्रेणी परीक्षेस बसता येईल.

**********

# परीक्षा विद्यार्थी यादी नमुना

# GCC- COMPUTER SHORTHAND. EXAMINATION (ALL SUBJECT)DECEMBER - 2024

## Candidate list

**PAGE NO. :** . :

**NAME OF THE INSTITUTE :** ______________________

**INSTITUTE CODE NO.:**

***USE CODE NUMBERS ONLY** ( To be filled in by the Head of the Institute )

| Sr. No. | Name Of The Candidate | Form No. | Inst. Gen. Register No. | Subject Code No. | Signature Of Candidate |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

This is to Certify that the above enlisted candidates are the bonafide students of this Institute. They have fulfilled all the conditions required for appearing at the GCC- TBC Examination as per the rules and each candidates has signed personally.

**SEAL OF THE INSTITUTE**
**Phone No.---------------------------**
**E-mail Id. ----------------------------**

**SIGNATURE**
**HEAD OF THE INSTITUTE**